# जनता सहकारी बँक लि., पुणे

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

मुख्य कार्यालय – १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रस्ता, पुणे – ४११ ००२

www.janatabankpune.com

## सर्व सभासदांचे माहितीसाठी निवेदन

बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक (२०२२–२०२७) प्रक्रिया सुरू झाली असून **दि. ३१/१२/२०२१ अखेरची सभासद मतदार प्रारूप यादी** मल्टिस्टेट को–ऑप. सोसायटीज ॲक्ट, २००२, बँकेचे उपविधी आणि बँकेने तयार केलेले निवडणूक नियम यांस अधीन राहून तयार करण्यात आली आहे. वैयक्तिक तसेच संस्थात्मक सभासदांची प्रारूप यादी बँकेच्या सर्व शाखा व कार्यालये येथे बँकेच्या कामकाजाच्या वेळांत **दि. ६ जून २०२२ पर्यंत पाहण्यासाठी उपलब्ध असेल.**

सदर यादीबाबत कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, नावात दुरुस्ती/बदल असल्यास, कमी–जास्त नाव करावयाचे असल्यास वा अन्य कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास आवश्यक त्या पुराव्यासह लेखी पत्र **दि. ६ जून २०२२ पर्यंत** बँकेच्या शाखा व्यवस्थापकांकडे किंवा मुख्य कार्यालयाकडे पाठवावेत. तसेच सदरच्या प्रारूप यादीमधील संस्थात्मक सभासदांना बँकेने स्वतंत्रपणे पत्र/ईमेल पाठविले असून त्यांचेकडून प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा लेखी ठराव / पत्र मागविले आहे. तरी अशा संबंधित सभासद संस्थांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या नावाचा ठराव / पत्र दि. ६ जून २०२२ पर्यंत बँकेच्या शाखा व्यवस्थापकांकडे किंवा मुख्य कार्यालयाकडे पाठवावेत.

जे सभासद स्वत: थकबाकीदार असतील किंवा ज्या कर्जदारास जामीनदार असतील व तो कर्जदार थकबाकीदार असेल, असे सभासद सदरच्या प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेले नाहीत, याची नोंद घ्यावी. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी दि. ६ जून २०२२ पर्यंत आपली थकबाकी पूर्ण भरून खाते अद्ययावत करावे, जेणेकरून अशा सभासदांचा मतदार अंतिम यादीमध्ये समावेश करणे शक्य होईल. तसेच सर्व सभासदांनी दि. ६ जून २०२२ अखेर कोणतीही थकबाकी राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अन्यथा अशा सभासदांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट केली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सभासदांनी बँकेच्या ज्या शाखेतून सभासदत्त्व घेतले आहे, अशांची नावे त्याच शाखा / विभागातील यादीमध्ये समाविष्ट केलेली आहेत. मतदानासाठी सोयीचे जावे यासाठी सभासदांनी दि. ६ जून २०२२ पूर्वी बँकेकडे लेखी अर्ज केल्यास त्यांचे नाव निवासस्थानाच्या पत्त्यानुसार संबंधित विभागामधील यादीत समाविष्ट करता येईल.

सदरच्या प्रारूप यादीबाबत आलेल्या हरकतींवर **निवडणूक निर्णय अधिकारी श्री. आनंद कटके** (उपनिबंधक, नागरी बँक विभाग, सहकार आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे–४११ ००१) हे निर्णय घेणार असून यानुसार आवश्यक असल्यास दुरुस्ती/बदल करुन **दि. १० जून २०२२ रोजी अंतिम यादी प्रसिद्ध करतील.** अंतिम यादी तयार झाल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही, याची सभासदांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**

पुणे, दि. २६/५/२०२२

जनता सहकारी बँक लि., पुणे